Vol 6 Issue 7 Jan 2017 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 7 | JANUARY - 2017

# तरूण पिढीसाठी आदर्श ठरेल असा योध्दा, " स्वातंत्र्याचा महानायक टिपू सुलतान "

प्रा. डॉ. शकील शेख
प्रमुख, मराठी विभाग, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग,
ता. बार्शी, जि. सोलापूर,




## प्रस्तावना –

मराठी साहित्यात 'चरित्र' ग्रंथाचे लेखन आठशे ते नऊशे वर्षापासून केले जात आहे. इ. स. १२७८ मध्ये 'लीळाचरित्र' हा मराठी भाषेतील आद्यचरित्र ग्रंथ म्हाईमभटाने लिहिला. त्यानंतरच्या काळात विविध व्यक्तिंची चरित्रे लिहिली गेली. 'चरित्र' या शब्दाच्या अर्थाच्या विविध छटा दिसतात. 'चरित्र' हे नाम संस्कृत 'चर' धातूपासून तयार झालेले दिसते. याच धातूपासून 'चरित' हा शब्दही तयार झालेले आहे. 'चरित' चा अर्थ चललेला, चाललेला असा होतो. ते नाम म्हणून घेतले तर चाललेले अंतर, चाललेली स्थितिगती, चाललेल्या स्थितीगतीचा आलेख किंवा नकाशा असा लक्षणेने अर्थ घेतला जाऊ शकतो. 'चरित्रा' चा संबंध व्यक्तीच्या जीवनाशी आहे. चरित्रात सामान्यतः व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या घटनांचा क्रमवार कालानुसार इतिहास वा वृतान्त येतो. चरित्र म्हणजे एका व्यक्तीच्या जीवनाचा किंवा जीवनखंडाचा कालानुसार कलात्मक पध्दतीने आलेला वृतान्त. हा वृतान्त सत्य, वास्तव आणि प्रत्यक्ष घटनांवर किंवा त्या विषयीच्या संशोधनावर आधारलेला असतो. मराठी भाषेत संत, महंत, राष्ट्रपुरूष, उद्योजक, समाजसुधारक, खेळाडू, नेते, अभिनेते अशा विविध मान्यवर व्यक्तिंची चरित्रे लिहिली गेली. चरित्र नायकाच्या कार्यकर्तृत्वाची ओळख करून द्यावी, समाजाला मार्गदर्शन लाभावे, चरित्र नायकाचा विचार लोकांपर्यंत पोहचवावा, चरित्र नायकाच्या कार्यांचा गौरव व्हावा. अशा विविध कारणाने चरित्र लेखन केले जाते. अशा लेखनामुळे चरित्र नायकाचे कार्यकर्तृत्व समाजातील सर्वच घटकापर्यंत जाऊन पोहचते. त्यातून चरित्र नायकाचा गौरव तर होतोच पण त्याच बरोबर समाजातील विविध घटकांना एक प्रेरणाही मिळते.

म्हैसूरचा वाघ, स्वातंत्र्यासाठी इंग्रजांशी अखेरपर्यंत लढा देणारा म्हणून ज्या वीराचा सतत गौरव केला जातो त्या टिपू सुलतानच्या कार्यकर्तृत्वाची ओळख करून देणाऱ्या 'स्वातंत्र्याचा महानायक – टिपू सुलतान' ह्या चरित्र ग्रंथाचे लेखन प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी यांनी केले आहे. टिपूच्या संपूर्ण चरित्रावर प्रकाश टाकणाऱ्या या ग्रंथाचे प्रकाशन रत्नप्रिया प्रकाशन सोलापूर यांनी केले आहे.

प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी यांनी या ग्रंथाचे लेखन २१ प्रकरणांमध्ये केले असून या २१ प्रकरणांमध्ये त्यांनी टिपू सुलतानच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू अत्यंत अभ्यासपूर्ण रितीने उलघडले आहेत.

इ. स. १०६० या काळात एकूण सहा राज्यात म्हैसूरची विभागणी करण्यात आली. इ. स. १३३६ मध्ये हिंदू सत्ताधिश आले, त्या दरम्यान येथे विजयनगरचे साम्राज्य स्थापित झाले. त्यानंतरच्या काळात विजयनगरच्या राज्यात म्हैसूरचा समावेश करण्यात आला. थोड्याच काळात विजयनगरच्या सत्तेला उतरती कळा लागली, विजयनगरचे साम्राज्य लहान-लहान घटकात विभागले गेले. विजयनगरच्या ऱ्हासानंतर पुन्हा म्हैसूरमध्ये इ. स. १६०८ मध्ये वडियार घराण्याचे राज वडियार यांची सत्ता आली. इ. स. १७६१ मध्ये वडियार राजच्या सैन्यात नवाब हैदरअली नोकरीला आले. आपल्या कर्तृत्वाच्या, प्रामाणिकतेच्या आणि राजनिष्ठेच्या जोरावर हैदरअली म्हैसूरचे राजे बनले. म्हैसूरचे राजे बनल्यानंतर हैदरअलीने आपल्या कार्यकर्तृत्वाने आपल्या राज्याचा विस्तार केला. त्याच्याकडे जे मदतीसाठी आले त्यांना मदत केली. ज्यांनी त्याच्याविरूध्द षडयंत्र रचले त्यांना संपवले. अशा या हैदरअलीचा टिपू हा मुलगा ! टिपूचा जन्म झाला तेंव्हा हैदरअली म्हैसूरचा राजा कृष्णराव यांच्या फौजेत एक मामूली अधिकारी होता पण टिपूच्या जन्मानंतर तो काही वर्षातच म्हैसूरचा सर्वेसर्वा बनला.

टिपू आठ वर्षाचा असताना हैदरअली यांनी टिपूला धार्मिक शिक्षणाबरोबर कन्नड, इंग्रजी, फ्रेंच या भाषेच्या शिक्षणाबरोबरच सैनिकी शिक्षण देण्याची व्यवस्था केली. वयाच्या १६ व्या वर्षापर्यंत टिपूचे हे शिक्षण चालू होते.

हैदरअली युध्दाच्या मोहिमेवर जाताना छोट्याा टिपूला आपल्या सोबत घेऊन जातं. लहानपणापासूनच युध्द मोहिमेत सहभागी झालेला टिपू वयाच्या सोळा-सतरा वर्षापर्यंतच एक कर्तव्यदक्ष सैनिक बनला होता. वयाच्या पंधराव्या वर्षी मलवारच्या मोहिमत टिपू आपल्या वडिलांसोबत युध्दात सहभागी झाला. तेंव्हा या मोहिमेत टिपूला तीन हजार सैनिकांची तुकडी देऊन पालीगारांना थंड करण्यासाठी हैदरअलीने पाठवले, या मोहिमेत टिपू यशस्वी झाला.

हैदरअली स्वतः अशिक्षित असला तरी त्याने टिपूला प्रत्येक क्षेत्रातील शिक्षण देऊन तज्ञ बनविले. इ. स. १७६० मध्ये टिपूने इंग्रजांच्या विरोधात पहिली लढाई केली आणि त्यात तो यशस्वी झाला. टिपूचा अल्लावर प्रचंड विश्वास होता, असे असले तरी त्याने आपल्या जीवनात सर्व धर्मांना स्थान दिले, सर्व धर्माचा सन्मान केला. तत्कालीन नाण्यांवरील हिंदू देव-देवतांची चित्रे त्याने तशीच ठेवली, अनेक हिंदू मंदिरांना देणग्या दिल्या, हजारो एकर शेती मंदिराच्या व्यवस्थापनेसाठी दिली, दलितांना आरक्षण दिले. आपल्या राज्यात दलितांना नोकरी देण्यासाठी त्याने कायदा केला. दलितांना आरक्षण देऊन दलितांच्या जीवनात अमुलाग्र बदल करण्यासाठी, दलित उध्दारासाठी कार्य करणारा टिपू हा जगातला पहिला राजा होता. टिपू हा धर्मनिरपेक्ष वृत्तीने राज्य करणारा राजा होता. टिपूने अनेक अनिष्ठ प्रथा, परंपरा मोडीत काढल्या, अंधश्रध्दांचे निर्मूलन केले.

टिपूने अनेक समाज उपयोगी कार्य केले. राज्यात अनेक सुधारणा केल्या. हैदरअली आणि टिपूने पहिल्यांदा या देशात आरमार उभे केले. टिपू स्वतः मैदानात उतरून लढाई करत असे. वाघ पाळणे हा टिपूचा आवडता छंद होता, टिपूला इंग्रज घाबरत होते, टिपूचे कार्य नि कर्तृत्व नेपोलियन बोनापार्टपेक्षा महान होते. टिपू जसा कणखर होता तसाच तो दयाळूही होता. त्याने सर्व धर्मातील अनाथांसाठी आपल्या राज्यात अनाथाश्रमाची स्थापना केली होती. टिपूची न्याय व्यवस्था सशक्त होती. टिपूने पंचायत राज्य निर्मिती केली. त्यामुळेच टिपू पंचायत राज्य निर्मितीचा जनक ठरतो. टिपूच्या कालखंडात जनगणनेला सुरूवात झाली. टिपूचे सारे जीवनच देशप्रेमाने भरून राहिले होते. टिपूने आपल्या राज्यास समृध्द व संपन्न करण्यासाठी, राज्यकारभार पारदर्शक होण्यासाठी विविध खात्यांची निर्मिती केली होती. जवळ जवळ दोन कि. मी. पर्यंत मारा करणारी मिसाईल या काळात निर्माण करण्यात आली होती. त्यामुळे मिसाईलचा जनक म्हणूनही टिपूकडे पाहिले जाते. इंग्रजांचे वाढते साम्राज्य, जुलुम, अन्याय, अत्याचार पाहून इंग्रजांच्या विरोधात लढण्यासाठी टिपूने निजाम, मराठे यांना वारंवार आवाहन केले. पण टिपूला कुणीच साथ दिली नाही. टिपू एकटाच झुंजारपणाने इंग्रजांशी दोन हात करत होता. इंग्रजांना सळो की पळो करून सोडत होता. इंग्रजांशी चौथी लढाई करत असताना टिपूचे सेनापती फितूर झाले. टिपूच्याच नातेवाईकांनी गद्दारी केली. अशा वेळी टिपूने तह करून आपली सत्ता वाचवण्याऐवजी रणांगणांत शहीद होणेच पसंत केले. असा हा स्वाभिमानी, शुर योध्दा तरूण पिढीला आदर्श ठरावा असाच आहे.

'स्वातंत्र्याचा महानायक - टिपू सुलतान' च्या माध्यमातून टिपू सुलतानच्या प्रशासनाची, त्यांच्या लढाईची, त्यांच्या धर्मनिरपेक्षतेची, संशोधन, शास्त्र, युध्दनिती, दलितांना सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी केलेल्या कार्याची, त्यांच्या न्याय व्यवस्थेची, देशप्रेमाची, त्यांच्या स्वाभिमानाची नोंद प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी यांनी २१ प्रकरणांत व २३६ पानांच्या माध्यमातून घेतली आहे. वास्तविक पाहता टिपूचे कार्यकर्तृत्व एवढे मोठे आहे की त्याची नोंद घेण्यासाठी २३६० पाने देखील कमी पडतील. तरी पण प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी यांनी थोडक्यात टिपूच्या जीवनावरील महत्त्वपूर्ण घटना प्रसंगावर प्रकाश टाकला आहे.

प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी यांनी टिपू यांचे कार्यकर्तृत्व 'स्वातंत्र्याचा महानायक - टिपू सुलतान' च्या माध्यमातून वाचकांसमोर ठेवले आहे. या चरित्र ग्रंथाची भाषा साधी सोपी, सहज समजेल अशी आहे. तांबोळी यांनी अत्यंत अभ्यासपूर्णरित्या टिपूचे चरित्र लेखन करून खरा टिपू कसा होता हे वाचकांना दाखवून दिले आहे.

*संदर्भ ग्रंथ*

१.जोशी अ. म., "चरित्र - आत्मचरित्र", सुविचार प्रकाशन मंडळ प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर, १६५६.
२.वष्ट जयंत, "मराठी चरित्र : रूप आणि इतिहास", पद्मगंधा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, २००६.
३.जोशी अ. म., प्रदक्षिणा, "चरित्र वाङ्मय", कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पाचवी आवृत्ती, १६७२.
४.कऱ्हाडे सदा, "चरित्र आणि आत्मचरित्र", लोकवाङ्मय प्रा. लि. मुंबई, प्रथमावृत्ती, १६७६.
५.तांबोळी इ. जा., "स्वातंत्र्याचा महानायक - टिपू सुलतान", रत्नप्रिया प्रकाशन सोलापूर, प्रथमावृत्ती, २०१६.



*प्रा. डॉ. शकील शेख*
*प्रमुख, मराठी विभाग, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग,*
*ता. बार्शी, जि. सोलापूर,*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org